**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक ०९/०७/२०२६ (गुरूवार )**

---

## बलात्कार करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे अप क्र. ४३०/२०२० कलम ३७६, ३०७, ३६४, ३२५ भादवी सहक. ३ (२) (५), ३(१) (डब्ल्यु) (i) (ii), ३(२) (५a) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, सदर गुन्हयातील आरोपी नामे पंकज दिलीप चौधरी, वय २९ वर्षे, रा. घाटंजी ता. घाटंजी, जि यवतमाळ याला फिर्यादीने लग्नास नकार दिल्याने आरोपीने दिनांक ३१/०७/२०२० रोजी रात्री १०:०० वाजताच्या सुमारास फिर्यादीस चाकूचा धाक दाखवून जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून सातगाव फाटा परीसरात निर्जनस्थळी नेले. तेथे तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार करून मारहाण केली, दगडाने तिच्या चेहऱ्यावर मारून गंभीर जखमी केले तसेच वायरने गळा आवळुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला पुढील उपचारादरम्यान फिर्यादीच्या बयानावरून तक्रारीवरून वर प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

**प्रथम तपासी अधिकारी श्री राजेंद्र चव्हाण, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ०९/०७/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १२ जहीर अब्बास शेख यांनी नमुद आरोपी नामे पंकज दिलीप चौधरी, वय २९ वर्षे,रा. घाटंजी ता. घाटंजी, जि यवतमाळ यास कलम ३६४ भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास, कलम ३७६ भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०,००० /— रूपये दंड , दंड न**

**भरल्यास २ महिने साधा कारावास आणि कलम ३०७ भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५०,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग — प्रभार उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बुटीबोरी, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी सफौ अनिल व्यवहारे, ब. नं. ६२० पोलीस स्टेशन बुटीबोरी यांनी मदत केली आहे.

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत शालेय बस/वाहन चालकांच्या विशेष बैठका आणि उपाययोजना तसेच विदयार्थ्यांना केले मार्गदर्शन

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत बालाजी कॉन्व्हेन्ट अँड सेकंडरी स्कूल, बुटीबोरी येथे शालेय बस आणि इतर वाहन चालक, वाहक तसेच संबंधित शाळांच्या प्रतिनिधी यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीस सर्वोच्च प्राधान्य देत शाळा व्यवस्थापनाला शालेय बसची फिटनेस, विमा, परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, बस चालक व अटेंडंट यांची चारित्र्य पडताळणी करून त्यांच्या राहत्या पत्त्याची व इतर आवश्यक माहितीची नोंद ठेवणे तसेच सर्व शालेय बसमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र व सीट बेल्टची व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय बस चालक व अटेंडंट यांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे पालन करणे,

विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणीच चढविणे व उतरविणे, वाहनाच्या खिडक्यांना आवश्यक सुरक्षा जाळी व रॉड बसविणे, पावसाळयात ओव्हरहेड वीजतारा, मोठी झाडे व इतर धोकादायक ठिकाणी वाहन उभे न करणे, वाहन नियंत्रित वेगाने चालवून अचानक ब्रेक लावण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेणे तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.तसेच उपस्थित शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतुक नियम, गुड टच, बैड टच, सायबर क्राईम इत्यादी विषयांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ०८/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन अरोली, भिवापूर, नरखेड, बोरी पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ६१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे मुकेश मनोहर महाजन, वय ४५ वर्ष, रा. खंडाळा गुजर, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १) महिला आरोपी २) मनोहर तुळशीराम भलावी, वय ५५ वर्ष, रा. चोरखैरी, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे चंदु उर्फ चंद्रप्रकाश वासुदेव वासे, वय ४६ वर्ष, राहणार सातगाव रिधोरा, तालुका हिंगणा, जिल्हा नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५८५० मिली देशी दारू, ३५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६१००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# पोस्टे नरखेड हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ०८/०७/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, नरखेड हद्दीतील मौजा मोवाड परिसरात सार्वजनिक ठिकाणी अवैधरीत्या एक इसम लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस हे घटनास्थळी पोहचले असता नरखेड हद्दीतील मौजा मोवाड परिसरात **आरोपी रमेश राजाराम बोरकर, वय ५९ वर्षे, रा. मोवाड,**

**तह. नरखेड** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ११८५/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण ११९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी रमेश राजाराम बोरकर, वय ५९ वर्षे, रा. मोवाड, तह नरखेड यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**